(431)

# घोषणापत्र

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

दिनांक २६/०६/२०२४.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्हयातील ५० रिक्त समुदाय आरोग्य अधिकारी या पदाकरीता मुंबई कार्यालयाकडून जाहिरात प्रसिध्द केलेली होती. त्यानुसार मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे यांच्या वतीने दि.२२/०१/२०२३ रोजी प्रवेश परिक्षा पार पडलेली असून, प्रवेश परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर यांच्या वतीने दि.१०/०३/२०२३ रोजी समुपदेशन प्रक्रियेणे ४६ उमेदवारांना प्रशिक्षण केद्रांचे वाटप करण्यात आलेले होते.

उमेदवारांचे ०६ महिण्याचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर, संबधित उमेदवारांची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्यामार्फत Exit Exam घेण्यात येते. Winter-२०२३ मध्ये पार पडलेल्या Exit Exam मध्ये सोलापूर जिल्हयांतील एकुण ४६ पैकी ४० उमेदवार उत्तीर्ण झालेले असुन, सदरील उमेदवारांना पदस्थापना देणेबाबत मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्याकडील दि.१२/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार समुपदेशनाने पदस्थापना देणेकामी मार्गदर्शक सुचनेनुसार समिती गठीत केलेली आहे.

त्यानुसार सोलापूर जिल्हयांकरीता एकुण ४० उमेदवार उत्तीर्ण झालेले असुन, सदरील उमेदवारांना समुपदेशन प्रक्रियेने पदस्थापना देण्यात येत असुन, सदरील समुपदेशन प्रक्रिया दिनांक २८/०६/२०२४ रोजी वार शुक्रवार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (DPM) कक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापुर या ठिकाणी पुर्ण होणार आहे. तरी त्यांचे वेळापत्रक खालील तक्ता अ प्रमाणे

"तक्ता अ"

| अ. क्र. | वेळ | तपशिल |
|---|---|---|
| १ | सकाळी १०.३० ते ११.३० | उमेदवार नोंदणी, हजेरी |
| २ | सकाळी १२.०० ते ०१.३० | समुपदेशनाने नियुक्ती आदेश वितरण |

तरी उमेदवारांकरीता असलेल्या इतर सुचना, माहिती, उमेदवारांची गुणवत्ता यादी इ. बाबी पुढील प्रमाणे नमुद करण्यात आलेल्या आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापुर.

# उमेदवारांकरीता सुचना

१) उमेदवारांनी दिलेल्या वेळेनुसार कार्यालयामध्ये उपस्थित राहण्याच्या सोईने व भौगोलिक परिस्थितीचा अंदाज घेऊन आपल्या प्रवासाचे नियोजन करावे.

२) उमेदवारांनी फोटो ओळखपत्र म्हणुन वाहन परवाना / पॅनकार्ड / अधारकार्ड / निवडणुक ओळखपत्र यापैकी एक मुळ ओळखपत्र सोबत आणावे.

३) समुपदेशन प्रक्रियेकरीता आणि नियुक्ती दिलेल्या ठिकाणी हजर राहणेकामी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल. समुपदेशन प्रक्रियेस उपस्थित राहणेकामी कार्यालयाकडून कोणताही भत्ता अदा केला जाणार नाही.

४) पदस्थापना देण्याची प्रक्रिया हि वरील नमुद केलेल्या त्या एकाच दिवशी दिलेल्या वेळेनुसार पार पडणार असुन, विहीत मुदतीनंतर कोणत्याही उमेदवारास कोणताही हक्क बजावता येणार नाही. त्याकरीता उमेदवारांने दिलेल्या वेळेत अथवा वेळेपूर्वी १० मिनीटे उपस्थित रहावे.

५) राष्ट्रीय आरोग्यं अभियान अंतर्गत असलेली सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची करार तत्वावरील असल्याने, पदस्थापनेत बदल अथवा बदलीचे धोरण लागू नसल्याने, एकदा घेण्यात आलेली पदस्थापना कोणत्याही सबबीवर बदलली जाणार नाही यांची प्रामुख्याने नोंद घ्यावी.

६) समुपदेशन प्रक्रियेकरीता सोलापुर जिल्हयांची भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करुन उमेदवारांनी समुपदेशनास उपस्थित रहावेत. (उदा : तालुके, PHC, Sub Center, तालुक्यापासूनचे अंतर, वेळ, वाहतुक/दळणवळण व्यवस्था मुलबक प्रमाणात आहे/नाही. इ.)

७) मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई कार्यालयाकडील सुचनेनुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक कडील Exit Exam नुसार पडलेल्या गुणाच्या अधारे गुणवत्तेनुसार पुढील तक्ता ब नुसार गुणाणुक्रमे यादी तयार करण्यात आलेली आहे.

८) गुणवत्ता यादी तयार करताना, मा. आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, रा.आ.अ.,मुंबई यांच्याकडील सुचनेनुसार प्रथम उमेदवारांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन, (BAMS,BUMS,B.Sc नर्सिंग) यानुसार उमेदवारांची निवड केलेली असून, समान गुणांवर एकसमान शैक्षणिक अर्हता आल्यास, पदवी परिक्षेतील गुणानुसार अनुक्रम ठरविण्यात आलेला आहे. तसेच शैक्षणिक अर्हता एकसमान आल्यास, जन्म तारखेनुसार वरिष्ठ उमेदवारास प्राध्यान्य यानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे.

९) उमेदवारांना गुणवत्ता यादीप्रमाणे पदस्थापना देण्यात येणार असलेल्या ठिकाणाचा तालुकानिहाय, प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रनिहाय तक्ता दर्शविण्यात येईल. त्यातुन उमेदवारांने त्यांच्या पसंतीने उपकेंद्र निवडुन समितीस सांगावे. त्यानुसार संबधित ठिकाणाचा पदस्थापना आदेश उमेदवारांस देण्यात येईल.

**Google Map Link** ( समुपदेशन ठिकाण )

**https://goo.gl/maps/gWoHkcXuorEgV1Ze9**

{ टिप :- सोलापुर बस स्थानक येथील श्री. छत्रपती शिवाजी महाराज पुतळापासुन शहर रिक्षा उपलब्ध असुन, जिल्हा परिषद स्टॉप सांगितल्यास रंगभवन चौक येथे सोडतात. रंगभवन चौक येथून ५ मिनटाच्या पायी अंतरावर जिल्हा परिषद, सोलापुर आहे. }

435

## हिवाळी २०२३ परिक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रशिक्षणार्थी समुदाय आरोग्य अधिकारी यांची Exit Exam निकालावरुन गुणवत्ता यादी

| Sr. No. | Name of student | Marks | Result | Education | Degree Marks | Date of Birth |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tamboli Shahebaj Shekhalal | 241 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 2 | Masiha Shruti Santosh | 239 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 3 | Mule Aparna Dhananjay | 236 | PASS | BAMS | ----- | ----- |
| 4 | Dhekane Pragati Shivaji | 234 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 5 | Shaikh Muskan Farukh | 233 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 6 | Swami Nagayya Basayya | 230 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 7 | Salve Samata Dhanyakumar | 226 | PASS | BAMS | ----- | ----- |
| 8 | Shinde Rasika Manikprabhu | 224 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 9 | Sawade Sonali Shivaji | 222 | PASS | BAMS | ----- | ----- |
| 10 | Vedpathak Pushpanjali Nandkishor | 221 | PASS | BSC NURSING | 74.00 | ----- |
| 11 | Ghodake Rupali Vitthal | 221 | PASS | PBSC NURSING | 65.67 | ----- |
| 12 | Kumbhare Pradnya Genasidha | 219 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 13 | Mule Dhananjay Hanumant | 217 | PASS | BAMS | 65.32 | ----- |
| 14 | Mane Akanksha Dharmendra | 217 | PASS | BAMS | 62.00 | ----- |
| 15 | Mirkale Shubhangi Hanmant | 217 | PASS | PBSC NURSING | 69.50 | ----- |
| 16 | Kharaje Ashvini Namadeo | 217 | PASS | BSC NURSING | 66.00 | ----- |
| 17 | Shinde Swapnali Bhauso | 215 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 18 | Sorate Pradnya Vijay | 214 | PASS | BSC NURSING | 73.80 | ----- |
| 19 | Waghmode Kishor Anil | 214 | PASS | BSC NURSING | 66.00 | ----- |
| 20 | Waghmare Pooja Eknathrao | 213 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 21 | Yadav Suyash Shivaji | 212 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 22 | Satav Kanchan Arjun | 209 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 23 | Jadhav Pooja Bajirao | 206 | PASS | BAMS | ----- | ----- |
| 24 | Sutar Gururaj Ramchandra | 206 | PASS | BSC NURSING | 76.60 | ----- |
| 25 | Kale Prasad Bhausaheb | 206 | PASS | BSC NURSING | 73.60 | ----- |
| 26 | Shaikh Vasim Mansur | 205 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 27 | Sonavane Tanuja Vyankat | 204 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 28 | Dhawale Komal Vinayak | 200 | PASS | BAMS | ----- | ----- |
| 29 | Bhosale Pradnya Prakash | 199 | PASS | BSC NURSING | 81.60 | ----- |
| 30 | Fakir Ayesha Vajir | 199 | PASS | BSC NURSING | 63.40 | ----- |
| 31 | Shaikh Nilofar Naushad | 197 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 32 | Medidar Kallappa Somaning | 196 | PASS | BSC NURSING | 70.73 | ----- |
| 33 | Late Bhagyashree Manohar | 196 | PASS | BSC NURSING | 59.60 | ----- |
| 34 | Dhanake Komal Rajendra | 192 | PASS | BSC NURSING | 66.00 | 4-Apr-1998 |
| 35 | Lade Mayuri Vishnu | 192 | PASS | BSC NURSING | 66.00 | 7-Feb-2000 |
| 36 | Hortikar Kalavati Shrishail | 189 | PASS | BSC NURSING | 72.60 | ----- |
| 37 | Pawar Seema Arjun | 189 | PASS | BSC NURSING | 59.60 | ----- |
| 38 | Honakande Bhagyashree Kantappa | 187 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 39 | Shejale Kavita Sanyappa | 180 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |
| 40 | Navi Savitri Dasharath | 167 | PASS | BSC NURSING | ----- | ----- |

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर.